महाराष्ट्र शासन

क्रमांक:- एनजीसी-२००५/(५७९ /०५)/ मशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक:- २४ ऑगस्ट, २००५

प्रति,
कुलसचिव,
एस.एन. डी.टी. विद्यापीठ,
मुंबई

विषय:- **अध्यापक महाविद्यालय सुरु करण्याबाबत..**

संदर्भ:- शासनाचे क्र. अमवि-२००४/(२७१/०४)/ मशि-३, दि. ६ ऑगस्ट, २००४

महोदय,

राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद , भोपाळ यांनी **बॅ. नाथ पै. शिक्षण संस्था, सिंधुदूर्ग** या संस्थेस कुडाळ, जि. सिंधुदूर्ग येथे नवीन अध्यापक महाविद्यालय सन २००५-०६ या वर्षापासून काही अटी व शर्तीवर मान्यता दिली आहे. सदर मान्यता लक्षात घेऊन उपरोक्त संस्थेस शासनाकडे भविष्यात अनुदानासाठी वा इतर आर्थिक बाबीसाठी मदत मागणार नाही अशा आशयाचे हमीपत्र एस.एन.डी.टी. विद्यापीठ , मुंबई व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, यांचेकडे सादर करण्याच्या अटीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (५) नुसार सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षापासून **कायम विना अनुदान तत्वावर** नवीन अध्यापक (बी.एड.) महाविद्यालय एन. सी. टी. ई. भोपाळ यांनी दिलेल्या मान्यतेनुसार सुरु करण्यास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.

१. एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.
२. तसेच एन.सी.टी.ई. भोपाळ यांच्या मान्यतेच्या पत्राची खातरजमा विद्यापीठाने करणे आवश्यक राहील.

२. आपले लक्ष शासनाच्या संदर्भाधीन दिनांक ६ ऑगस्ट , २००४ च्या पत्राकडे वेधण्यात येत आहे. त्यानुसार वरील अटींबाबत खातरजमा केल्यानंतरच विद्यापीठाने संलग्नीकरण देण्याबाबतची आवश्यक असलेली पुढील कार्यवाही करुन पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य , पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक यांना कृपया पाठवावा.

आपला ,

(स्वाक्षरी)

**( भि. क. उसारे )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य , पुणे.
संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
खाजगी सचिव, मा. मंत्री (उच्च शिक्षण)
खाजगी सचिव , मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.)
अध्यक्ष, **बॅ. नाथ पै शिक्षण संस्था, सिंधुदूर्ग**
निवड नस्ती - मशि-३